वाचले – १. मे. शासन निर्णय मइवाधी - २०२१/ प्र.क्र. २५/तांक ४ दिनांक ३/०७/२०२१.

२. मा. आयुक्त यांचेकडील दि. ७५ / ०६ /२०२३ चे मंजुर प्रस्ताव

---

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे-४११०१८
बांधकाम परवानगी व अनधिकृत
बांधकाम नियंत्रण विभाग
जा.क्र. - बीपी/०५/कावि/६० /२०२३
दिनांक- २२ /०६/२०२३

विषय :- नवीन निवासी इमारतींना बांधकाम परवानगी देतेवेळी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेची अट अंतर्भूत करणेबाबत.....

आदेश,

"महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ राबविणेस मे महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण व वातावरणीय बदल समितीने संदर्भाकित शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नवीन निवासी इमारतींना तसेच अन्य वापराच्या इमारतींना बांधकामास मान्यता देतेवेळी सदर शासन निर्णयातील अ.क्र. ७ ते १० येथे नमूद बाबींचा उल्लेख करणे बंधनकारक असेल असे शासन निर्णयात नमूद आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने वरील संदर्भ क्र. २ अन्वये झालेल्या बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड मनपातील प्रत्येक प्रकल्पातील प्रती ५० कारपार्किंगच्या मागे एक चार्जिंग पॉईट स्टेशन देणेस मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तथापि, नगारिकांची वाहन वापरणेची वाढती क्षमता पाहता EV वाहनांची चार्जिंगसह पार्किंग व्यवस्थेचे प्रमाण वाढविणे आवश्यक असल्याने नविन बांधकाम करताना खालील अटीसह बांधकाम परवानगी देणेत येत आहे.

१) यापुढे नव्याने प्रस्तावित होणा-या इमारतींना बांधकाम परवानगी देतेवेळी सदर मान्यतेच्या अटीमध्ये इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगसाठी अतिरिक्त इलेक्ट्रिक लोड विद्युत महामंडळाकडून मान्य करून घेणेच्या अटींचा समावेश करणेत यावा.

२) नवीन निवासी इमारतींचे बांधकाम प्रस्तावामध्ये २० पेक्षा अधिक चारचाकी वाहनांसाठी अचल पार्किंग Immovable Parking संख्या असल्यास सदर पार्किंग संख्येच्या २०% संख्येसाठी इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंट ठेवण्यात यावा व सदर २०% पैकी ३०% क्षेत्र हे समाईक पार्किंग क्षेत्रामध्ये असावे किंवा एकूण सामाईक पार्किंग संख्येच्या २०% पार्किंग क्षेत्र हे इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंटसह उपलब्ध करून देणेत यावे.

३) नवीन व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, शॉपिंग मॉल्स, मल्टीप्लेक्स, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, आय टी पार्क बांधकाम प्रस्तावामध्ये ५० पेक्षा अधिक अचल पार्किंग (Immovable Parking) चारचाकी वाहनांची पार्किंग सुविधा असल्यास अशा मिळकतींमध्ये एकूण पार्किंगच्या २५% हे इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी सुसज्ज चार्जिंग व्यवस्थेसह राखीव ठेवणे बंधनकारक राहील व त्याकरिता आवश्यक असलेला अतिरिक्त लोड विद्युत महामंडळाकडून मंजूर करणेत यावा.

तथापि, सदर धोरणामधेच आस्तीत्वातील सार्वजनिक पार्किंग प्लाझा तसेच संस्थालय आणि व्यावसायिक संकुले येथील पार्किंगबाबत खालीलप्रमाणे तरतुदी आहेत.

१) सार्वजनिक पार्किंग प्लाझा त्यांच्या एकूण क्षमतेच्या किमान २५ टक्के जागा, सन २०२३ पर्यंत इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज जागांमध्ये रूपांतरित करतील.

२) सर्व संस्थात्मक आणि व्यावसायिक संकुले सन २०२३ पर्यंत, त्यांच्या एकूण पार्किंग जागांपैकी किमान २५ टक्के जागा इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज जागांमध्ये रूपांतरित करतील.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे -१८ EV पार्किंग बाबत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे. तरी सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकांपासुन करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे -१८